क्रमांक : पोमसं / ८अ/ संवर्गबाह्य बदली / गट -ड / १०१/२०१७ मुंबई , दिनांक : ०४/०७/२०१७

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र एसआरव्ही २०१०/ प्र.क्र.२१०/१०/१२, दिनांक ०३/०६/२०११.
२. महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्र टिआरएन ०४१३/ प्र.क्र.४६०/पोल-५ब, दिनांक २९/१०/२०१३.

**विषय :-** "गट-ड" कर्मचाऱ्यांच्या संवर्गबाह्य बदलीबाबत.

* * * * * *

**परिपत्रक :-**

शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासन सेवेतील "गट - ब " (अराजपत्रित) व "गट - क " कर्मचाऱ्यांच्या जिल्हा संवर्ग बाह्य बदली करण्यासाठी अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. सदर अटी व शर्ती नुसार पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपीक / मुफसल लिपीक / जिल्हा लिपीक संवर्गातील लिपीकांच्या त्यांच्या विनंती नुसार संवर्गबाह्य बदल्या या कार्यालयाकडून करण्यात येत आहेत.

२. "गट-ड" वर्गातील कर्मचाऱ्यांच्या संवर्गबाह्य बदलीबाबत शासन निर्णय दि. ०३/०६/२०११ मधील अटी व शर्ती लागू होतात किंवा कसे याबाबत शासनाने सदर्भ क्रमांक २ अन्वये कळविले आहे की, "गट-ड" मधील कर्मचाऱ्यांची संवर्ग बाह्य बदली करताना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०३/०६/२०११ नुसार करावी लागेल. त्यानुसार "गट-ड" कर्मचाऱ्यांच्या संवर्गबाह्य बदल्या ह्या सद्य परिस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर त्यांच्या विनंती नुसार करण्यात येत आहेत.

३. पोलीस विभागातील बरेचसे "गट-ड" चे कर्मचारी एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयामध्ये बदली करण्याकरीता वारंवार या कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर करीत असतात. अशा कर्मचाऱ्यांच्या बदल्या करतांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०३/०६/२०११ मधील अटी व शर्तीची पूर्तता होते किंवा कसे हे तपासून विनंती वरुन संवर्गबाह्य बदलीचे आदेश निर्गमित करावे लागतात. बदली कायदा २००६ मधील तरतुदीनुसार सदरची कार्यवाही प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणजेच परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या स्तरावर करता येऊ शकेल. त्याकरीता "गट-ड" कर्मचारी शासन निर्णय दिनांक ०३/०६/२०११ मधील अटी व शर्तीची पुर्तता करीत आहेत किंवा कसे याची बदली करण्यापूर्वी याची तपासणे आवश्यक आहे.

४. तरी, घटक प्रमुखांना विनंती आहे की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील "गट-ड" कर्मचाऱ्यांना इतरत्र कार्यालयामध्ये बदली करण्याबाबतचे विनंती अर्ज संबंधित परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे योग्य मार्फतीने सादर करण्याबाबत सूचना द्याव्यात. त्यानुसार राज्यातील सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी परिक्षेत्रांतर्गत व राज्याअंतर्गत "गट-ड" मधील कर्मचाऱ्यांचे बदलीचे प्रकरणात बदली अधिनियम २००५ मधील कलम ०६ मधील तक्त्यातील नोंद (घ) सह संदर्भ क्र. १ मधील स्थायी आदेश विचारात घेऊन यापुढे त्यांच्या स्तरावर बदल्या करण्यात याव्यात. तसेच येथून पुढे पोलीस महासंचालक कार्यालयाकडे "गट-ड" कर्मचाऱ्यांचे अर्ज पाठवू नयेत अशा स्पष्ट सूचना "गट-ड" कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

**(अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल./ वाहतूक / दहशतवाद विरोधी पथक / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग / बृहन्मुंबई सह )

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे / पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर /नक्षल विरोधी अभियान, नागपूर

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे. / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, मुंबई

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / अे.सी.बी. घटक कार्यालये / गु.अ.वि. घटक कार्यलयांसह).

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.१ ते १६.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय.

प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

उपसंचालक, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक.

प्रत सविनय सादर,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.